N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** नायगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0169 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/11/2022 01:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 07/11/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/11/2022

**Time From (वेळेपासून):** 18:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/11/2022 **Time (वेळ):** 00:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/11/2022 00:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी सज्जा कार्यालय नायगांव , नायगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): माधव सदगुरू गायकवाड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुळ रा शिंदे गल्ली, नायगाव, , नायगाव, ,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुळ रा शिंदे गल्ली, नायगाव, , नायगाव, ,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9421758314

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बालाजी सिताराम राठोड | | | 1. कष्णवाडी तांडा, ता मुखेड, मुखेड,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | तडजोडी अंती 3,500/ रूपयाची लाच स्विकारलेली आहे. | 3,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांकः-07/11/2022.

मी माधव सदगुरू गायकवाड, वय 35 वर्श, व्यवसाय षेती व सलुन, मुळ रा. षिंदे गल्ली, नायगाव, ता. नायगाव, जि. नांदेड मो.नं.9421758314 व 7020814951

ला.प्र.वि.नांदेडचे पथकासोबत पोलीस स्टेशन नायगाव येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहाणारा असुन, मला एक मुलगा व एक मुलगी आहे. मी शेती व सलुनचा व्यवसाय करतो. नायगाव शिवारात माझे नावावर 40 आर व माझी आई राजाबाई सदगुरू गायकवाड हिचे नावाने 1 हेक्टर 47 आर शेती आहे.

मी डिसेंबर 2020 मध्ये आमचे शेताचे शेजारी विक्रीस निघालेली 2 आर शेती विठ्ठल दिगांबर चव्हाण रा. नायगाव यांच्याकडुन 5,11,000/-रूपयास नोंदणीकृत रित्या खरेदी केली आहे. त्या शेतीच्या सातबारावर माझे नाव लावण्याकरीता मी तलाठी बी.एस.राठोड यांना लगेच भेटुन कागद पत्र दिले होते. तेंव्हा ते काम करतो म्हणाले. त्यांनी माझे नाव सातबारावर लावले परंतु इतर अधिकारातील इतरांचे नावे कमी केले नाहीत. ते कमी करण्याकरीता मी त्यांना वारंवार भेटलो परंतु ते इतर अधिकारातील नावे काम करीत नव्हते. म्हणुन मी दिनांक 7/10/2022 रोजी तहसीलदार नायगाव यांना लेखी विनंती अर्ज दिलेला आहे. त्याच प्रमाणे दिनांक 5/11/2022 रोजी दुपारी अंदाजे एक वाजता मी तलाठी राठोड यांना त्यांच्या नायगाव येथील सहकारी सोसायटीच्या बाजुस असलेल्या त्यांच्या तलाठी सज्जा कार्यालयात भेटुन मी खरेदी केलेल्या शेताच्या सातबारावरील इतर अधिकारातील नावे कमी करण्याच्या संबधाने विनंती केली असता, त्यांनी मला या कामाकरीता ''चार हजार रूपये द्या. कधीही घेवुन या काम करून देतो.'' म्हणुन मला लाचेची मागणी केली. लाच देणे ही कायद्याने गुन्हा असल्याने मी त्यांना लाच देणार नाही. म्हणुन मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही होण्याकरीता आज दिनांक 7/11/2022 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली. तलाठी श्री बी.एस.राठोड यांच्याशी माझी कोणत्याही प्रकारचे अर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. कोणत्याही प्रकारची पुर्व दुश्मनी वैमनस्य नाही.

मी दिलेल्या तक्रारी वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.श्री गजानन बोडके यांनी पत्रव्यवहार करून पंचाना कार्यालयात बोलावुन घेतले. पंच क्रं. 1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम, लिपीक सामाजिक वनिकरण विभाग नांदेड, 2)श्री संदीप रंगनाथ गाडे, वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, विभाग नांदेड यांचा त्याच प्रमाणे ला.प्र. वि कार्यालय नांदेड येथील पथकात सहभागी होणारे सदस्य पो.नि. श्री कालीदास ढवळे, स.पो.उप.नि.श्री शेटे, पोलीस नाईक राजेश राठोड, पो.काण श्री यषवंत दाबनवाड, ईश्वर जाधव चालक पो.ना. प्रकाष मामुलवाड यांचा परिचय करून दिला.

पो.कॉ. श्री ईष्वर जाधव यांनी नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पो.नि. श्री बोडके यांचे, माझे व पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. पथक सदस्यांनी संगणकीय तांत्रिक, लेखन साहित्य शासकीय वाहन टाटा सुमो एम.एच.26 आर. 267 मध्ये ठेवले. पो.नि. बोडके यांनी दिलेल्या सुचने नुसार मी व पो. कॉ ईष्वर जाधव असे माझी मोटर सायकल एम.एच.26 एई 9038 ने दुपारी 2.30 वाजता नांदेड येथुन निघुन नायगाव येथे अंदाजे साडे तिन वाजता पोहचुन लाचमागणी पडताळणी करीता माझा मित्र विठ्ठल बेलकर यांचे कडुन त्यांची मोटर सायकल क्रं. एम.एच. 26 बि.एन. 3378 ही घेवुन पो.कॉ. ईष्वर जाधव यांच्या ताब्यात दिली. व आम्ही पो.नि. श्री बोडके यांच्याशी मोबाईलवर संपर्कात राहुन त्यांच्या सुचने नुसार गंगनबीड रोडला अंदाजे सव्वा चार वाजता जावुन निर्जनस्थळी थांबलेल्या ला.प्र.वि. पथक प्रमुख पो.नि. श्री बोडके यांची भेट घेतली.

पो.नि बोडके यांनी मला तसेच पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम यांना लाचमागणी पडताळणी कार्यवाही संबधाने सुचना दिल्या. पो.कॉ.ईष्वर जाधव यांनी माझे ताब्यात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे गळ्यात शर्टच्या आत कोणास संशय येणार नाहीत अशा स्थितीत ठेवुन लोकसेवक तलाठी राठोड यांच्या भेटी करीता 16.44 वाजता रवाना केले. मी व पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम असे मोटर सायकलने

नायगाव सहकारी संस्था कार्यालया लगत असलेल्या तलाठी सज्जा कार्यालयात तलाठी राठोड यांची भेट घेतली. पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम यांच्या समक्ष तलाठी राठोड यांना माझे कामासंबधाने विचारणा केली असता त्यांनी मला'' रोज जर विचारला तरी तेच सांगणार'' म्हणाले मी त्यांना ''तुम्ही चार हजार म्हणाल्या पण थोड कमी'' म्हणालो. त्यांनी तडजोडी अंती ''साडे तीन हजार आणुन दे जा.'' म्हणुन 3,500/-रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शवीली. तेथुन आम्ही परत ला.प्र.वि. पथकाचे ठिकाणी 17.20 वाजता पोहचलोत. स.पो.उप.नि. श्री शेटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. पो.नि.श्री बोडके यांनी पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम यांना विचारणा केली. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले माझे लोकसेवक तलाठी राठोड यांच्याषी झालेले संभाषन लॅपटॉपवर पथकाने ऐकले. लाचमागणीची खात्री झाल्या नंतर पो.नि. बोडके यांनी ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन ते अल्ट्रॉव्हॉयलट प्रकाशात चकाकते याबाबत पथकाचे वाहनात कृत्रीम अंधार करून प्रात्यक्षिक दाखवीले. मी हजर केलेल्या पाचशे रूपये दराच्या सात नोटांचे क्रमाक पंच क्रं.2 श्री संदीप गाडे यांनी नोंदवुन घेतले. त्या नोटाना पो.ना. राजेष राठोड यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावुन लाचेची रक्कम माझे ताब्यात दिली. पो.नि.बोडके यांनी पंचाना मला तसेच पथकातील सदस्यांना दिलेल्या सुचना प्रमाणे सापळा पुर्व कार्यवाही केली.

पो.कॉ. ईश्वर जाधव यांनी 17.58 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉडर चालु करून माझे ताब्यात दिले. मी व पंच क्रं. 1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम माझे मोटर सायकलने, पो.कॉ.ईश्वर जाधव, स.पो.उप.नि.श्री शेटे मोटरसायकलने व ईतर पथकाचे वाहनाने आमचे मागे योग्य अंतर ठेवुन, सहकार संस्था नायगाव येथील तलाठी सज्जा कार्यालय नायगाव येथे सापळा लावण्यात आला. मी व पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम असे तलाठी राठोड यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान पंच क्रं.1)श्री सय्यद हबीब सय्यद अब्दुलरहीम यांच्या समक्ष लोकसेवक तलाठी राठोड यांनी माझेकडुन लाचेची रक्कम 3,500/-रू स्विकारून पॅन्टचे मागील उजव्या खिशात ठेवले. मी त्यांना ''माझे काम कधी होईल?'' म्हणुन विचारणा केली असता, त्यांनी मला ''सोमवारी'' म्हणाले. त्यानंतर तलाठी कार्यालयाचे बाहेर येवुन मी अंदाजे 18.30 वाजण्याचे सुमारास सुचने प्रमाणे लोकसेवक तलाठी राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारली असल्या सबंधी माझे हातातील दस्ती खांद्यावर ठेवुन ईशारा केला. तोच ला. प्र.वि. पथकाने तलाठी सज्जा नायगाव कार्यालयात प्रवेश केला. पथक प्रमुख पो.नि. बोडके यांनी तलाठी राठोड यांना परीचय देवुन लाचलुचपत प्रतिबंधक पथकाची कार्यवाही असल्याचे सांगीतले. पंच क्रं. 2)श्री संदीप रंगनाथ गाडे यांनी झडती घेतली असता लोकसेवक तलाठी राठोड यांच्या पॅन्टचे मागील उजव्या खिशात पाचशे रूपयांच्या सात नोटा असे 3,500/-रूपये मिळुन आले. पंच2)श्री संदीप रंगनाथ गाडे यांनी त्यांच्याकडील नोंद असलेल्या नोटांचे क्रमांक व तलाठी राठोड यांच्या ताब्यात मिळुन आलेल्या पाचशे रूपयांच्या सात नोटांचे क्रंमांकाची पडताळणी करून त्याच असल्याचे खात्री केली. त्याच प्रमाणे तलाठी कार्यालयात अंधार करून ह्या नोटा अल्ट्रॉव्हायलेट प्रकाशात तपासल्या त्यांना ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली. तसेच तलाठी राठोड यांच्या उजव्या हातावरही ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली.

पो.नि.श्री बोडके यांनी लोकसेवक राठोड यांना नाव पद राहण्याचा पत्ता विचारला असता त्यांनी त्यांनी आपले नाव बालाजी सिताराम राठोड, वय 44 वर्श, तलाठी नायगाव, रा. मुळ रा. कृश्णवाडी तांडा, ता. मुखेड, जि.नांदेड. असे सांगीतले. त्याच प्रमाणे पो.नि.श्री बोडके यांनी लोकसेवक तलाठी राठोड यांना माझे प्रलंबीत कामा बद्यल विचारणा केली असता काम झालेले आहे. असे सांगुन ऑनलाईन साताबाराची प्रिन्ट काढुन हजर केली.

बालाजी सिताराम राठोड, तलाठी नायगाव यांनी स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता पदाचा गैरवापर करून, मी खरेदी केलेल्या शेतीचे सातबारावरील ईतर अधिकारातील नावे कमी करण्याचे काम पुर्ण झालेले असतानाही आजपर्यन्त प्रलंबीत असल्याचे मला भासवुन ते काम करण्याकरीता मला 4,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3,500/- रूपये स्विकारण्याची तयारी दर्शवुन, दिनांक 07/11/2022 रोजी अंदाजे 18.30 वाजताचे सुमारास सेवा सहकारी संस्था नायगाव येथे असलेल्या तलाठी सज्जा कार्यालयात लाच रक्कम 3,500/- रूपये स्विकारलेली आहे.

तरी बालाजी सिताराम राठोड तलाठी सज्जा नायगाव यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली.

समक्ष
सही
गजानन शं.बोडके
पोलीस निरीक्षक

ला.लु.प्र.विभाग नांदेड

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Gajanan S. Bodke PI Anticurruption Nanded,

ABHISHEK LAXMAN SHINDE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Gaikwad

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ABHISHEK LAXMAN !
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

(बी.जी. कांडे ASI)
पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे नायगांव